# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 03 October 2024

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०३ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- निरंतर प्रयत्नांमुळेच स्वच्छ भारताचं उद्दीष्ट पूर्ण, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- स्वच्छता अभियानाची सांगता, रस्ते, बसस्थानकं, यासह विविध सार्वजनिक ठिकाणी लोकसहभागातून स्वच्छता
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या बाजार सावंगी प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रथम क्रमांकाचा राज्यस्तरीय कायाकल्प पुरस्कार
- नवव्या आयसीसी महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून शारजा इथं सुरुवात

आणि

- शारदीय नवरात्रोत्वाला प्रारंभ, घटस्थापनेची विविध मंदीरांमध्ये तयारी पूर्ण

****

निरंतर प्रयत्नांमुळेच स्वच्छ भारताचं उद्दीष्ट पूर्ण झाल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. स्वच्छता ही सेवा अभियानाच्या दशकपूर्तीनिमित्त काल नवी दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. स्वच्छ भारत अभियानाला जनआंदोलनाचं स्वरुप आलं असून, यामध्ये सहभाग घेतलेल्या सर्वांचे पंतप्रधानांनी आभार मानले.

आजपासून एक हजार वर्षांनंतर जेव्हा २१ व्या शतकातील भारताविषयी अभ्यास केला जाईल, तेव्हा स्वच्छ भारत अभियानाची आठवण होईल. या शतकात, स्वच्छ भारत हा जगातला सर्वात मोठा आणि लोकांच्या नेतृत्वाखालील लोकांचा संकल्प असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. ते म्हणाले,

***"आज से एक हजार साल बाद भी जब इकसवी सदी के भारत का अध्ययन होगा, तो उसमें स्वच्छ भारत अभियान को जरूर याद किया जायेगा। स्वच्छ भारत इस सदी में दुनिया का सबसे बडा और सबसे सफल जन भागीदारी वाला जन नेतृत्व वाला जन आंदोलन है।"***

यावेळी पंतप्रधानांनी स्वच्छतेशी संबंधित नऊ हजार सहाशे कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचा प्रारंभ केला. यात अमृत प्रकल्प स्वच्छ गंगा राष्ट्रीय अभियान आणि गोबरधन योजनेअंतर्गत १५ बायोगॅस प्रकल्पांचा समावेश आहे.

अमृत-दोन योजनेंतर्गत सातारा पालिकेच्या स्वयंचलित पाणीपुरवठा प्रकल्पाचं, नळजोडण्यांना अद्ययावत मीटर बसवण्याच्या कामाचं, तसंच लातूर इथल्या हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्र आणि औसा इथल्या शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचा यात समावेश आहे.

स्वच्छ भारत अभियानामुळे पाच लाख ५४ हजार गावं उघड्यावर शौचापासून मुक्त ठरली आहेत. या अभियानात ११ कोटी ६५ लाख घरगुती शौचालयं बांधण्यात आली. परिणामी अतिसारामुळे होणारे मृत्यू रोखण्यात यश आल्याचं, जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालात म्हटलं आहे.

****

दरम्यान, देशभरात कालही स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. रस्ते, बसस्थानकं, यासह विविध सार्वजनिक ठिकाणी लोकसहभागातून स्वच्छता करण्यात आली.

राष्ट्रीय महामार्गाच्या बांधणीच्या सामग्रीमध्ये ८० लाख टन विलगीकृत कचऱ्याचा वापर करण्यात आल्याची माहिती, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी दिली, ते काल नागपूर महापालिकेच्या श्रमदान कार्यक्रमात बोलत होते.

**

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी श्रीकांत यांनी अभिवादन केलं. शहरात शहागंज इथल्या गांधी पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या वतीनं काल छत्रपती संभाजीनगर इथं सामुहिक सूतकताई करण्यात आली. अडीच हजारांहून अधिक विद्यार्थी, शिक्षक तसंच

कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात सहभागी होत विविध प्रकारच्या चरख्यांवर सूतकताई केली. या उपक्रमाची नोंद आशिया बुक ऑफ रेकॉर्डस् मध्ये झाली आहे.

****

परभणी इथल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात काल स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. स्वच्छतेचे कार्य हे केवळ एक तास किंवा एक दिवसा पुरता न ठेवता कायमस्वरूपी सुरू ठेवण्याचं आवाहन कुलगुरू डॉ. इंद्रमणी यांनी यावेळी केलं.

लातूर जिल्हा परिषद परिसरात श्रमदान कार्यक्रम घेण्यात आला. स्वच्छ, सुंदर आणि निरोगी राहण्यासाठी स्वच्छता ही लोकचळवळ व्हावी असं प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी केलं.

नांदेड जिल्ह्यात लोहा तालुक्यातल्या पिंपळगाव येवला इथं जिल्हा प्रशासनातर्फे काल स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

****

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातले फरारी आरोपी तसंच संबंधित शाळा संस्थेचे अध्यक्ष उदय कोतवाल आणि सचिव तुषार आपटे या दोघांनाही ठाणे गुन्हे अन्वेषण विभागानं काल कर्जत परिसरातून अटक केली. या दोघांचाही ताबा राज्य शासनाने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाकडे दिला जाणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात खुलताबाद तालुक्यातल्या बाजार सावंगी या प्राथमिक आरोग्य केंद्राला २०२३-२४ या वर्षासाठीचा प्रथम क्रमांकाचा राज्यस्तरीय कायाकल्प पुरस्कार मिळाला आहे. जिल्ह्यातली १२ प्राथमिक आरोग्य केंद्रं तसंच २६ आरोग्यवर्धिनी केंद्रांनाही कायाकल्प पुरस्कार जाहीर झाला आहे. आरोग्य केंद्रातल्या उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचं, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी कौतुक केलं आहे.

****

नवव्या आयसीसी महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून शारजा इथं सुरुवात होत आहे. भारताचा पहिला सामना उद्या चार तारखेला न्यूझीलंडविरुद्ध होणार आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ या स्पर्धेत खेळणार आहे.

****

पेरु देशात लिमा इथं सुरु असलेल्या आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघाच्या कनिष्ठ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं चौथ्या दिवशी पाच सुवर्ण पदकांची कमाई केली. पुरुषांच्या ५० मीटर रायफल सांघिक स्पर्धेत शौर्य सैनी, वेदांत आणि परीक्षित सिंग यांच्या संघाने सुवर्ण पदक पटकावलं. सध्या या स्पर्धेत भारत १४ पदकांसह पदकतालिकेत आघाडीवर आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सिल्लोड इथं येत्या सोमवारपासून खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचं आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल यासंदर्भात झालेल्या बैठकीत ही माहिती दिली. या स्पर्धेत १० जिल्ह्यातल्या ४०० खेळाडूंचा सहभाग असेल. या स्पर्धा ५७ ते १२५ किलो पुरुष वजनी गटात तर ५७ ते ७७ किलो महिला वजनी गटात खेळवल्या जाणार आहेत.

****

शारदीय नवरात्रोत्सवाला आजपासून प्रारंभ झाला. मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यात माहूर, धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर, अंबाजोगाई इथं योगेश्वरी तसंच अंबड इथं मत्स्योदरी देवस्थानसह आदिशक्तीच्या सर्वच मंदिरांमध्ये नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी दिसून येत आहे.

तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी मातेची आज पहाटे मंचकी निद्रा संपून देवीची सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात आली. या नवरात्र महोत्सवात विविध अलंकार महापूजा मांडण्यात येणार असून, यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. आज दुपारी बारा वाजता तुळजाभवानी मंदिर समितीचे अध्यक्ष तथा धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांच्या हस्ते विधिवत घटस्थापना होणार आहे.

माहूर इथं नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. नवरात्रोत्सव कालावधीत ११० बस वाहतूक सेवेसाठी उपलब्ध राहणार असून, तीन आरोग्य पथकंही नियुक्त करण्यात आले आहेत.

अंबाजोगाई इथं आज सकाळी आठ वाजता बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या हस्ते सपत्निक वर्णी देऊन घटस्थापना तसंच योगेश्वरी देवीची महापूजा होणार आहे.

छत्रपती संभाजीनगरात कर्णपुरा इथल्या तुळजाभवानी देवीच्या यात्रेला आजपासून सुरवात झाली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी काल या स्थळाची पाहणी करून भाविकांसाठी केलेल्या सुविधा तसंच उपाययोजनांचा आढावा घेतला.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या जल आणि व्यवस्थापन संस्था – वाल्मीतील प्रशिक्षणार्थी अभियंत्यांनी शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्याचं आवाहन, उपजिल्हाधिकारी देवेंद्र कटके यांनी केलं आहे. वाल्मीच्या पंचेचाळीसाव्या स्थापना दिन कार्यक्रमात ते काल बोलत होते. या निमित्तानं वाल्मी परिसरात वृक्षारोपण करण्यात आलं.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या परंडा इथले शिवसेनेचे माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांचं काल पुण्यात निधन झालं, ते ५९ वर्षांचे होते. पाटील यांनी दोन वेळा परंडा विधानसभेचं प्रतिनिधित्व केलं होतं. धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिलं होतं. त्यांच्या पार्थिव देहावर आज परंडा इथं अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

****